# प्रेस नोट दिनांक ०४/०४/२०१९

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## बस मधील गंठण चोरी गुन्हा घडकीस आणलेबाबत.

चंदननगर पो.स्टे. गु.र.नं. ८३/२०१९, भा. द. वि. कम ३७९, ३४ मधील फिर्यादी रा. जुनी सांगवी, पुणे यांनी दि. २८/०२/१९ रोजी ११.३० वा. ते ११/३५ वा चे दरम्यान निगडी ते हडपसर या पीएमटी बसमधुन प्रवास करीत असताना व सदर बसमधुन खाली उतरत असताना बसमधील दोन अनोळखी महिलांनी पाठीमागुन रेटारेटी करुन त्यांचे खांदयास असलेले बॅगची चैन उघडुन बॅगमधील ८५,०००/- रु किंमतीचे ३.५ तोळे वजनाचे गंठण चोरुन नेल्या बाबत वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक– कृष्णा इंदलकर यांचे सुचनांप्रमाणे गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग चालु असतांना पोना अमित जाधव व पोशि विक्रांत सासवडकर यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हा करणा-या महिला नामे प्रभावती देवप्पा गायकवाड रा.सर्वोदय कॉलनी, मुंढवा, पुणे हीने व तिचे साथीदार यांनी केला असुन त्या बिकानेर स्वीट होम चौक, खराडी, पुणे याठिकाणी आलेल्या आहे सदर ठिकाणी मपोना अनुराधा बेंद्रे, तपासी अमंलदार पोहवा राजेंद्र दिक्षीत, पोना अमित जाधव, पोशि विक्रांत सासवडकर, पोना अमोल गायकवाड यांचेसह गेलो असता सदर महिला आरोपी १. प्रभावती देवप्पा गायकवाड वय- ५५ वर्षे रा., मुंढवा पुणे व २. कुंदा नागेश गायकवाड वय- ४५ वर्षे रा. सदर या मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन वरील गुन्हयामध्ये दि.०१/०४/१९ रोजी अटक करण्यात आलेली आहे. तसेच त्यांचेकडुन गुन्हयांतील चोरीस गेले रु. ८५,०००/- किंमतीचे ३.५ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची चांगली कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त साो, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. सुनिल फुलारी साो, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, श्री अक्कानवरू साो, सहा पोलीस आयुक्त येरवडा विभाग डॉ. श्री. शिवाजी पवार साो. यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. कृष्णा इंदलकर, पो.नि.गुन्हे - राजेंद्र काळे, तपासी अमंलदार पोहवा राजेंद्र दिक्षीत, पोना अमित जाधव, पोशि विक्रांत सासवडकर, पोना अमोल गायकवाड, मपोना अनुराधा बेंद्रे यांनी केलेली आहे.